दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com
# रयत समाचार
खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक
● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४९२ वा ● शनिवार, ता. १० जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

# डोनाल्ड ट्रम्प मानसिकदृष्ट्या अस्थिर- जेफ्री सॅक्स

## ५०० टक्के टॅरिफवरून अमेरिकन अर्थतज्ज्ञाची टीका




**वॉशिंग्टन । रयत समाचार**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाकडून तेलखरेदी करणाऱ्या देशांविरोधात ५०० टक्के आयात शुल्क (टॅरिफ) लावण्याच्या विधेयकाला पाठिंबा दिल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. चीन व भारतासह इतर देशांना रशियातून तेलखरेदीपासून परावृत्त करण्यासाठी हे पाऊल उचलल्याचे अमेरिकेने स्पष्ट केले असून, पुढील आठवड्यात हे विधेयक अमेरिकी काँग्रेसमध्ये मतदानासाठी मांडले जाण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध अमेरिकन अर्थतज्ज्ञ जेफ्री सॅक्स यांनी ट्रम्प यांच्यावर जोरदार टीका केली आहे. रिपब्लिक मीडिया नेटवर्कशी बोलताना सॅक्स यांनी ट्रम्प यांचा उल्लेख ''मानसिकदृष्ट्या अस्थिर'' असा करत, अमेरिका आता घटनात्मक चौकटीतून काम करत नसल्याचा इशाराही दिला. ''ट्रम्प यांच्यामुळे परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली आहे. ते देशांवर आक्रमणे करत आहेत, धमक्या देत आहेत, ५० हून अधिक आंतरराष्ट्रीय करार व संघटनांतून माघार घेतली आहे. अमेरिकेतील मोडकळीस आलेल्या राजकीय व्यवस्थेत ते एक मानसिकदृष्ट्या अस्थिर व्यक्ती ठरत आहेत. त्यामुळे घटनात्मक नियंत्रण उरलेले नाही,'' असे सॅक्स यांनी स्पष्ट केले. सध्या अमेरिकेत आयात होणाऱ्या भारतीय वस्तूंवर ५० टक्के टॅरिफ आकारले जात आहे. मात्र, आता हे शुल्क थेट ५०० टक्क्यांपर्यंत वाढवण्याची शक्यता व्यक्त होत आहे. ट्रम्प यांनी 'रशिया सँक्शन्स बिल'ला पाठिंबा दिल्यानंतर भारतासह अनेक देशांच्या चिंतेत भर पडली आहे. 'रशिया निर्बंध कायदा २०२५' नावाचे हे विधेयक दक्षिण कॅरोलिनाचे रिपब्लिकन सिनेटर लिंडसे ग्राहम आणि कनेक्टिकटचे डेमोक्रॅटिक सिनेटर रिचर्ड ब्लुमेंथल यांनी संयुक्तपणे तयार केले आहे. या कायद्यामुळे ट्रम्प यांना रशियाकडून तेल, वायू, युरेनियम व इतर वस्तू आयात करणाऱ्या देशांवर शुल्क व दुय्यम निर्बंध लादण्याचे अधिकार मिळणार आहेत. दरम्यान, तीन दिवसांपूर्वीच ट्रम्प यांनी भारतावर आयात शुल्क वाढवण्याचा इशारा दिला होता.

याबाबत माहिती देताना सिनेटर लिंडसे ग्राहम यांनी सांगितले की, रशियाकडून तेलखरेदी करून पुतिन यांच्या युद्धखोर धोरणाला मदत करणाऱ्या देशांवर या कायद्यामुळे जरब बसेल. डोनाल्ड ट्रम्प यांनी आतापर्यंत अमेरिका ६० आंतरराष्ट्रीय संघटनांतून बाहेर काढली असून, त्यात संयुक्त राष्ट्रसंघाच्या विविध संस्थांसह भारत-फ्रान्स सहभागी असलेली आंतरराष्ट्रीय सौर आघाडी यांचाही समावेश आहे. या संस्था कालबाह्य व अमेरिकेच्या हिताविरोधात असल्याचा दावा ट्रम्प यांनी केला आहे.

# माझी लढाई धोरणात्मक, वैयक्तिक नाही-सुप्रिया सुळे

## २५ जानेवारीला राष्ट्रवादी एकत्र येणार?



**मुंबई । रयत समाचार**

सध्या राजकारणात सगळेच सगळ्याच सोबत असल्याचे चित्र दिसत असून, सर्वत्र युती-आघाड्यांचे प्रयोग सुरू आहेत. मात्र, आम्ही आमच्या भूमिकेवर ठाम आहोत, असे स्पष्ट मत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) सत्तेत जाणार आणि सुप्रिया सुळे मंत्रिपदाची शपथ घेणार, अशी चर्चा सुरू असल्याबाबत विचारले असता त्या म्हणाल्या की, माझा कुणावरच राग नसतो. तो पूर्वीही नव्हता आणि आताही नाही. माझी लढाई ही धोरणात्मक आहे, वैयक्तिक कोणाशीच नाही. २५ जानेवारीला राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चांबाबत विचारले असता सुळे म्हणाल्या की, ही तारीख मी तुमच्याकडूनच ऐकत आहे. आम्ही पॉझिटिव्ह आहोत आणि ते चांगलेच आहे. आम्ही आठ खासदार निवडून आलो, हीदेखील एक सकारात्मक बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. महापालिका निवडणुकांबाबत बोलताना सुळे म्हणाल्या की, ही निवडणूक 'फ्री फॉर ऑल' झाली आहे. गुंडगिरी आणि पैशांचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू असून निवडणूक आयोगाकडून त्याची पुरेशी दखल घेतली जात नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. काँग्रेस आणि भाजप एकत्र आले तर काय बोलणार, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. महापालिका निवडणुकीतील प्रचार वेगळा असतो. काही उमेदवारांच्या प्रचारासाठी फुल ना फुलाची पाकळी म्हणून मदत करण्यासाठी आपण जातो, असे सुळे म्हणाल्या. अजित पवार यांच्यासोबत एकत्र प्रचार करणार का, या प्रश्नावर त्यांनी स्पष्ट केले की, उद्या आमचा जाहीरनामा प्रसिद्ध होत आहे. दरम्यान, सुनिल तटकरे यांनी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या तरी आपल्याला अडचण नाही, असे म्हटल्याबाबत विचारले असता सुळे म्हणाल्या की, तटकरे काय म्हणाले याची मला माहिती नाही. माझा कुणावरच राग नाही. माझी लढाई ही केवळ धोरणात्मक आहे, वैयक्तिक नाही, असे त्यांनी पुन्हा स्पष्ट केले.

# महापालिका निवडणुकीत विकासाऐवजी जातीयवादाचे मुद्दे- सपकाळ



**अहमदनगर । रयत समाचार**

राज्यात सुरू असलेल्या महापालिका निवडणुकांमध्ये स्थानिक विकासाचे मुद्दे बाजूला सारून जाणीवपूर्वक जातीयवाद पसरवण्याचा प्रयत्न केला जात असून 'मराठी विरुद्ध उर्दू' असा वाद निर्माण केला जात आहे, असा गंभीर आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. महापालिका निवडणूक प्रचारासाठी अहिल्यानगर दौऱ्यावर आले असताना शुक्रवारी ते पत्रकारांशी बोलत होते. यावेळी खासदार निलेश लंके, काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

सपकाळ म्हणाले की, राज्यातील महापालिका निवडणुकांमधून विकासाचे मुद्दे गायब झाले आहेत. मुख्यमंत्रीही विकासावर बोलत नाहीत. महापौर मराठी होणार की उर्दू होणार, महाराष्ट्रातील की उत्तर प्रदेशातील होणार, यावरून जाणीवपूर्वक वाद निर्माण केला जात असून समाजात जातीय तणाव पसरवला जात आहे. भाजपने एमआयएमसोबत युती केल्यामुळे 'कटेंगे तो बटेंगे' हे त्यांचे धोरणच मागे पडले आहे. भाजपचे खायचे दात आणि दाखवायचे दात वेगळे आहेत, हे यातून स्पष्ट झाले आहे. भाजप आणि एमआयएम हे एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याची टीकाही त्यांनी केली. सपकाळ यांनी आरोप केला की, काँग्रेसला प्रचारासाठी हेलिकॉप्टर मिळू नये, सभेसाठी मैदाने उपलब्ध होऊ नयेत, यासाठी भाजपकडून प्रयत्न केले जात आहेत. आमच्यावर पाळत ठेवली जात असून दौरे, बैठका यांची माहिती गोळा केली जात आहे. हे लोकशाही प्रक्रिया 'ब्लॉक' करण्याचे प्रयत्न आहेत. भाजपला लोकशाहीची निकोप प्रक्रिया नको असून 'मेरी आवाज सुनो' हेच धोरण राबवायचे आहे. दमदाटी, पैशाचा वापर करून बिनविरोध निवडी करण्यात आल्या असून आता प्रत्यक्ष निवडणुकीत काही ठिकाणी बंदूक घेऊन फिरण्याचे प्रकार सुरू आहेत. याच पार्श्वभूमीवर सोलापूर, खोपोली व अकोट येथे निवडणूक काळात खून झाल्याचा आरोपही त्यांनी केला. भाजपकडे स्वतःचे नेते व कार्यकर्ते नसल्याने ते इतर पक्षांतील नेते व कार्यकर्ते पळवत असल्याचा आरोप करत सपकाळ म्हणाले की, भाजप ही विरोधकांची नेते 'खाणारी चेटकीण' बनली आहे. दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे नाव पुसण्याचा प्रयत्न भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण करत असल्याचा आरोप करत सपकाळ म्हणाले की, भाजप फक्त विलासराव देशमुखच नव्हे, तर अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे यांच्याही आठवणी पुसण्याचा प्रयत्न करत आहे. रेशीमबागेत हेडगेवार व गोळवलकर गुरुजी यांच्याऐवजी नरेंद्र मोदी व अमित शहा यांचे पुतळे बसवण्याचा भाजपचा प्रयत्न असल्याची टीकाही त्यांनी केली.

# आदिवासी संस्कृती देशाच्या विकासाचा मजबूत पाया- मुख्यमंत्री विष्णू देव साय



**काणकोण । रयत समाचार**

आदर्श युवा संघ, श्री बलराम शिक्षण संस्था तसेच कला व संस्कृती संचालनालय व आदिवासी संशोधन संस्था, गोवा सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रौप्यमहोत्सवी 'आदी लोकोत्सव२५'चे भव्य उद्घाटन आदर्शग्राम आमोणेपैंगीण येथे उत्साहात पार पडले. या उद्घाटन सोहळ्यास छत्तीसगड राज्याचे मुख्यमंत्री विष्णू देव साय प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमास आयोजन समितीचे अध्यक्ष व कला व संस्कृती खात्याचे मंत्री डॉ. रमेश तवडकर यांची विशेष उपस्थिती होती. स्वागतपर भाषणात मंत्री डॉ. रमेश तवडकर म्हणाले की, 'आदी लोकोत्सव' हा केवळ उत्सव नसून आदिवासी समाजाच्या परंपरा, संस्कृती, कला व जीवनपद्धतीचे जतन व संवर्धन करणारे महत्त्वाचे व्यासपीठ आहे. आदर्श युवा संघाने ग्रामीण व आदिवासी भागात युवकांना केंद्रस्थानी ठेवून सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे हा महोत्सव आज राष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण करणारा ठरला आहे. उद्घाटनानंतर मुख्यमंत्री विष्णू देव साय यांनी उपस्थितांना संबोधित करताना आदर्श युवा संघ व मंत्री डॉ. रमेश तवडकर यांच्या कार्याची प्रशंसा केली. आदिवासी समाज देशाच्या विकासात मोलाची भूमिका बजावत असून त्यांच्या संस्कृतीत निसर्गाशी नाते, परिश्रम व प्रामाणिकपणा दडलेला आहे. अशा उत्सवांमुळे आदिवासी समाजाची ओळख देश-विदेशात पोहोचते, असे त्यांनी सांगितले. छत्तीसगडमध्ये नक्षलवादाविरोधात राबविण्यात आलेल्या मोहिमांचा उल्लेख करताना मुख्यमंत्री साय म्हणाले की, केंद्र सरकारच्या मार्गदर्शनाखाली व राज्य सरकारच्या ठोस धोरणांमुळे नक्षलवादावर निर्णायक प्रहार करण्यात यश आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजासाठी शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, रोजगार व सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. वनवासी समाजाच्या सक्षमीकरणाशिवाय विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. या सोहळ्यास राजस्थान येथील एस.टी. मोर्चा प्रदेशाध्यक्ष व आमदार गोपीचंद मीणा, पैंगीण जिल्हा पंचायत सदस्य अजय लोलयेंकर, पैंगीण पंचायत सरपंच सविता तवडकर, काणकोण नगरपालिकेचे नगराध्यक्ष लक्ष्मण पागी, आगोंद पंचायत सरपंच निलेश पागी, लोलयें पंचायत सरपंच निशा च्यारी, आदर्श युवा संघाचे अध्यक्ष चंद्रकांत वेळीप, खोतिगांव पंचायत सरपंच जयेश गावकर, काणकोण भाजप मंडळ अध्यक्ष प्रभाकर गावकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय गावकर यांनी केले तर आभार प्रदर्शन चंद्रकांत वेळीप यांनी केले.

# तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण होणे गरजेचे-आ. राजळे



**शेवगाव । लक्ष्मण मडके**

वाघोली येथे न्यू आर्ट्स महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी आमदार मोनिका राजळे यांनी तरुणांना समाजाशी जोडले जाण्याचे आवाहन केले. अशा शिबिरांच्या माध्यमातून तरुणांमध्ये सोशल कनेक्ट व सामाजिक बांधिलकी निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे.

तरुणांनी समाजासाठी आपला खारीचा वाटा उचलल्यास वैयक्तिक आयुष्यातील संघर्षांना सामोरे जाण्याची प्रेरणा आपोआप मिळते, असे त्या म्हणाल्या. सुसंस्कृत व सुजाण पिढी राष्ट्राला देणे ही सामाजिक, राजकीय व शैक्षणिक व्यवस्थेची सामूहिक जबाबदारी असल्याचे नमूद करत त्यांनी संस्कारांची व्याप्ती वाढवून त्यामध्ये श्रमसंस्कारांची जोड देण्याची गरज व्यक्त केली. केवळ विचारांपुरते न थांबता प्रत्यक्ष कृतीतून समाज घडवावा लागेल, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा मराठा शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य डॉ. बाळकृष्ण मरकड होते. यावेळी साहित्यिक डॉ. संजय कळमकर, तहसीलदार आकाश दहाडदे, सरपंच सुष्मिता भालसिंग, उपसरपंच कल्पना भालसिंग, प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे, बापूसाहेब भोसले, उमेश भालसिंग आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. संजय कळमकर यांनी बदलत्या सामाजिक संकल्पनांच्या पार्श्वभूमीवर तरुणाईला सामाजिक भान देण्याची गरज अधोरेखित केली. ग्रामविकासाच्या संकल्पना प्रत्यक्षात राबवणारे उमेश भालसिंग यांच्यासारखे तरुण गावोगावी निर्माण होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

सोशल मीडियाच्या आभासी जगात अडकून मातीशी असलेली नाळ तुटत चालल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमात उमेश भालसिंग, तहसीलदार आकाश दहाडदे व प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. युवराज सुडके, मोहन गवळी, सुभाष दातीर, पांडूरंग भालसिंग, राजेंद्र जमधडे, छाया भालसिंग, सोपान नवथर, गोकुळ क्षिरसागर, रविंद्र वैद्य, भाऊसाहेब अडसरे यांच्यासह ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सात दिवसांच्या शिबिरात शाश्वत विकासासाठी युवक, पाणलोट क्षेत्र विकास व पडीक जमीन व्यवस्थापन या विषयांवर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोकुळ क्षिरसागर यांनी केले, सूत्रसंचालन सोमेश्वर शेळके यांनी तर आभार गहिनीनाथ शेळके यांनी मानले.



# देशातील ४४ टक्के शहरे कायमस्वरूपी वायुप्रदूषणाच्या विळख्यात

**नवी दिल्ली । रयत समाचार**

देशातील सुमारे ४४ टक्के शहरे दीर्घकालीन वायुप्रदूषणाचा सामना करत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. मात्र, यापैकी केवळ ४ टक्के शहरेच राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमात (NCAP) समाविष्ट असल्याचे Centre for Research on Energy and Clean Air (CREA) च्या अहवालात स्पष्ट झाले आहे. CREA ने उपग्रह माहितीच्या आधारे देशातील ४,०४१ शहरांमधील २.५ पातळीचे विश्लेषण केले. २०१९ ते २०२४ या कालावधीत (२०२० हे कोविड वर्ष वगळून) किमान १,७८७ शहरे दरवर्षी राष्ट्रीय मानकांपेक्षा जास्त PM २.५ प्रदूषण अनुभवत असल्याचे आढळून आले. यामुळे वायुप्रदूषण ही तात्पुरती समस्या नसून सातत्याने उत्सर्जन करणाऱ्या स्रोतांमुळे निर्माण झालेली संरचनात्मक समस्या असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. २०२५ च्या PM २.५ मूल्यांकनानुसार मेघालयातील Byrnihat दिल्ली आणि उत्तर प्रदेशातील Ghaziabad ही देशातील सर्वाधिक प्रदूषित शहरे ठरली असून त्यांची वार्षिक २.५ पातळी अनुक्रमे १००, ९६ आणि ९३ मायक्रोग्राम प्रति घनमीटर इतकी नोंदवली गेली आहे. या यादीत नोएडा, गुरुग्राम, ग्रेटर नोएडा, भिवाडी, हाजीपूर, मुझफ्फरनगर आणि हापूर या शहरांचाही समावेश आहे. अहवालात नमूद करण्यात आले आहे की, केंद्र सरकारचा National Clean Air Programme (NCAP) सध्या केवळ १३० शहरांपुरता मर्यादित असून त्यापैकी फक्त ६७ शहरे ही सातत्याने प्रदूषण मानकांवर अपयशी ठरणाऱ्या शहरांमध्ये येतात. परिणामी, देशातील बहुतांश प्रदूषित शहरे लक्ष केंद्रीत उपाययोजनांपासून वंचित राहिली आहेत. राज्यनिहाय पाहता उत्तर प्रदेशात सर्वाधिक ४१६ नॉन-अटेन्मेंट शहरे असून त्यापाठोपाठ राजस्थान (१५८), गुजरात (१५२), मध्य प्रदेश (१४३), पंजाब व बिहार (प्रत्येकी १३६) आणि पश्चिम बंगाल (१२४) यांचा क्रमांक लागतो. PM १० संदर्भातही परिस्थिती चिंताजनक असून दिल्लीत वार्षिक सरासरी PM १० पातळी १९७ मायक्रोग्राम नोंदवली गेली आहे, जी राष्ट्रीय मानकाच्या तिप्पट आहे.NCAP अंतर्गत आतापर्यंत ₹१३,४१५ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी ७४ टक्के निधी खर्च झाला आहे. यातील ६८ टक्के खर्च रस्त्यावरील धूळ नियंत्रणावर झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.CREA चे भारत विश्लेषक मनोज कुमार यांनी सांगितले की, वायुप्रदूषणावर मात करण्यासाठी PM २.५ आणि त्यास कारणीभूत वायूंच्या नियंत्रणावर भर देणे, उद्योगांसाठी कडक मानके लागू करणे आणि प्रादेशिक पातळीवर 'एअरशेड' आधारित धोरण राबवणे आवश्यक आहे.



# दिल्लीकर चाखणार अहिल्यानगरचा हुरडा

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

महाराष्ट्राची अस्सल गावरान चव आता देशाच्या राजधानीत पोहोचली आहे. नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनात सुरू असलेल्या संक्रांत मेळाव्यात आता अहिल्यानगर जिल्ह्याचा हुरडा दिल्लीकरांच्या पसंतीस उतरणार आहे. नेवासा तालुक्यातील गुरुकृपा हुरडा पार्टीची या महोत्सवासाठी राज्यभरातून निवड झाली असून, ही जिल्ह्यासाठी मोठी अभिमानाची बाब ठरली आहे. नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनात ९ ते ११ जानेवारी २०२६ या काळात मकर संक्रांतीनिमित्त विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात महाराष्ट्राची खाद्यसंस्कृती मांडण्यासाठी राज्यभरातून अनेक शेतकरी गट आणि संस्थांच्या अर्जांची छाननी झाली. त्यातून नेवाशाचे सतीश भांगे यांच्या गुरुकृपा हुरडा पार्टीची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी दिली. या मेळाव्याचे उद्घाटन प्रसिद्ध अभिनेते भरत जाधव यांच्या हस्ते आणि महाराष्ट्र सदनच्या आयुक्त आर. विमला यांच्या उपस्थितीत झाले. भरत जाधव यांनीही या गावरान उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. या महोत्सवात केवळ हुरडाच नाही, तर गरमागरम मक्याची कणसं, अस्सल गूळ, काकवी, वांग्याचे भरीत, उसाचा रस आणि ताजा भाजीपाला दिल्लीकरांना मिळणार आहे. विशेष म्हणजे शेत ते थेट ताट या संकल्पनेमुळे दिल्लीतील खवय्यांना थेट शेतकऱ्यांच्या शेतातील ताजे पदार्थ चाखता येणार आहेत. कृषी विभागाच्या या उपक्रमामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नवी बाजारपेठ व हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे, असे मत श्री. बोराळे यांनी व्यक्त केले.



# मांजरसुंबा येथे पंचायतराज अभियानांतर्गत वृक्षारोपण

**नगर तालुका । रयत समाचार**

आदर्श गाव मांजरसुंबा येथे मुख्यमंत्री पंचायतराज अभियानांतर्गत केशर आंबा व मोरपंखी वृक्षांची लागवड करण्यात आली. या वृक्षारोपण मोहिमेचा प्रारंभ सरपंच रूपाली कदम यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना सरपंच रूपाली कदम म्हणाल्या की, मांजरसुंबा गावात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून पर्यावरण संवर्धनाचे कार्य हाती घेण्यात आले असून, पुढील काळातही ही मोहिम सातत्याने राबवली जाणार आहे. या प्रसंगी उपसरपंच जालिंदर कदम, ग्रामविकास अधिकारी सारिका वाळुंज, सहाय्यक कृषी अधिकारी सुविधा वाणी, बाणेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. सागर कोहक, डॉ. स्वाती वाघ, प्रा. पूनम राऊत, ऋषिकेश शिंदे, संदीप वाघमारे, सागर वाघमारे, भीमा कदम तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.



# लोकशाही उत्सव

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक – २०२५-२६





## विकासकामांतून ओळख निर्माण करण्याचा अपक्ष 'स्वाभिमानी केडगाव' पॅनलचा निर्धार

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्वात मोठे उपनगर असलेल्या केडगाव परिसरातील प्रभाग क्रमांक १६ मध्ये 'स्वाभिमानी केडगाव' अपक्ष पॅनल नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे.

या पॅनलने मांडलेल्या नियोजनबद्ध विकास आराखड्याला नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, विकासकामांतून केडगाव उपनगराची वेगळी ओळख निर्माण करण्याचा निर्धार उमेदवारांनी व्यक्त केला आहे. 'स्वाभिमानी केडगाव' अपक्ष पॅनलचे उमेदवार सविता कराळे, भूषण गुंड, सागर सातपुते व विमल कांबळे यांनी केडगाव उपनगराच्या सर्वांगीण विकासासाठी सविस्तर आराखडा तयार केला आहे. या आराखड्याचे नागरिकांकडून स्वागत होत असून, केडगावच्या विकासाला नवी दिशा देण्याचा विश्वास उमेदवारांनी व्यक्त केला. यावेळी उमेदवारांनी सांगितले की, माजी सभापती भानुदास कोतकर, माजी महापौर संदीप कोतकर व माजी उपमहापौर सुवर्णा कोतकर यांनी केडगावच्या विकासासाठी पाहिलेले स्वप्न प्रत्यक्ष विकासकामांतून साकार करण्याचा आमचा प्रयत्न राहील. प्रभागातील पाणीपुरवठा, रस्ते, उद्याने, पथदिवे, ड्रेनेज लाईन व स्वच्छता अशा मूलभूत सुविधांसह पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपण व संवर्धनावर विशेष भर दिला जाणार आहे. तसेच महापालिकेच्या माध्यमातून दर्जेदार शिक्षण व आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी केडगावचा आवाज महापालिका सभागृहात प्रभावीपणे मांडला जाईल, असा विश्वास चारही अपक्ष उमेदवारांनी व्यक्त केला. नागरिकांच्या सहभागातून व नियोजनबद्ध पद्धतीने विकासकामे राबवून केडगाव उपनगराला शहरातील आदर्श व विकसित भाग म्हणून ओळख मिळवून देण्याचा निर्धार 'स्वाभिमानी केडगाव' अपक्ष पॅनलने केला आहे.

# शिवसेना उमेदवाराची पोलीस संरक्षणाची मागणी

## प्रचारात अडथळे व धमक्यांचा कुलकर्णी यांचा आरोप

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ११ मध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाल्याचा गंभीर आरोप शिवसेना (एकनाथ शिंदे) उमेदवार नरेंद्र कुलकर्णी यांनी केला आहे. उमेदवारी अर्ज भरण्यापासून ते प्रचारापर्यंत प्रतिस्पर्धी उमेदवार व त्यांच्या समर्थकांकडून धमकावणे, दहशत निर्माण करणे व प्रचारात अडथळे आणण्याचे प्रकार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या शिष्टमंडळाने शुक्रवार, ता. ९ जानेवारी रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन कुलकर्णी यांना तातडीने पोलीस संरक्षण देण्याची तसेच प्रभाग क्रमांक ११ हा संवेदनशील प्रभाग म्हणून घोषित करण्याची मागणी केली. शिष्टमंडळात



शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, नरेंद्र कुलकर्णी, संजय शेंडगे, गणेश कवडे, दिपक खैरे, श्याम नळकांडे, मयूर मैड, दत्ता जाधव, संदीप दातरंगे, सचिन शिंदे, सतीश मैड, प्रशांत गायकवाड, श्याम शिंदे, संदेश कार्ले, संतोष ग्यानप्पा यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कुलकर्णी यांनी निवेदनात नमूद केले आहे की, ते पत्नी व मुलासह प्रभाग क्रमांक ११ मध्ये वास्तव्यास असून, महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी सर्वसाधारण पुरुष 'ड' प्रवर्गातून धनुष्यबाण चिन्हाखाली शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या प्रभागातून सत्ताधारी पक्षाचे प्रतिस्पर्धी उमेदवारही निवडणूक लढवत आहेत.


कुलकर्णी यांचा आरोप आहे की, प्रतिस्पर्धी उमेदवारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी असून त्यांच्या समर्थकांकडून प्रचारादरम्यान जाणूनबुजून अडथळे निर्माण केले जात आहेत. घराबाहेर मोठ्या संख्येने जमाव करून दहशत निर्माण केली जात असल्याने प्रचार करणे तसेच दैनंदिन जीवन जगणेही कठीण झाले असून कुटुंब प्रचंड मानसिक तणावाखाली आहे. ८ जानेवारी रोजी रात्री तख्ती दरवाजा परिसरात घडलेल्या घटनेचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, प्रतिस्पर्धी उमेदवार व समर्थकांनी मोठ्या संख्येने जमून शिवीगाळ, धक्काबुक्की करत जीवे मारण्याची धमकी दिली. "तू माझ्याविरुद्ध निवडणूक का लढवतोस, तुला जिवंत ठेवणार नाही," अशी धमकी देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या घटनेवेळी पोलीस उपस्थित असतानाही हस्तक्षेप न केल्याचा दावा त्यांनी केला. या प्रकारांमुळे प्रभाग क्रमांक ११ मध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून पुढील काळात अनुचित घटना किंवा दंगलसदृश परिस्थिती उद्भवण्याची शक्यता असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, म्हणजेच २० जानेवारी २०२६ पर्यंत स्वतःसह कुटुंबीयांना पोलीस संरक्षण देण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी प्रकरणाची तात्काळ दखल घेत निवडणूक दहशतमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी दोषींवर कारवाई केली जाईल तसेच नरेंद्र कुलकर्णी यांना पोलीस संरक्षण देण्यात येईल, असे आश्वासन शिवसेनेच्या शिष्टमंडळाला दिले.

## अखेर विक्रम राठोड शिवसेनेत दाखल

**पुणे । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला मोठा धक्का बसला आहे. युवा सेनेचे राज्य सहसचिव तथा माजी नगरसेवक विक्रम राठोड यांनी ठाकरे गटाला रामराम ठोकत आमदार रवींद्र धंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना (शिंदे गट) मध्ये जाहीर प्रवेश केला आहे.



पुणे येथे झालेल्या कार्यक्रमात विक्रम राठोड यांनी शिंदे गटात प्रवेश केला. त्यांच्या या प्रवेशामुळे नगर शहराच्या राजकारणात हालचालींना वेग आला असून, आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

## पोस्टल बॅलेटसाठी १०० टक्के मतदानाचे उद्दिष्ट – यशवंत डांगे

**अहमदनगर । रयत समाचार**

निवडणूक प्रक्रियेत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने टपाली मतदानाची (पोस्टल बॅलेट) संपूर्ण व्यवस्था करण्यात आली आहे. या सुविधेचा लाभ घेऊन निवडणूक कर्तव्यावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी लोकशाहीने दिलेला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे यांनी केले. निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी मोठ्या संख्येने शासकीय व निमशासकीय कर्मचारी नियुक्त केले जातात. कर्तव्यामुळे कोणाचाही मतदानाचा हक्क डावलला जाऊ नये, यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार टपाली मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. मतदान कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणावेळी याबाबत यशवंत डांगे यांचा आवाहनाचा व्हिडिओ प्रसारित करण्यात आला असून आवश्यक सूचनाही देण्यात आल्या. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये उत्साह दिसून येत आहे. अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात मतदार म्हणून नोंदणी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अंतिम मतदार यादीत आपले नाव व क्रमांक तपासून, ज्या प्रभागात ते मतदार आहेत त्या प्रभागाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे प्रपत्र पीबी१ नमुन्यात अर्ज करून टपाली मतपत्रिकेची मागणी करावी. अर्जासोबत निवडणूक कर्तव्यावर नियुक्तीचा आदेश जोडणे आवश्यक आहे. त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांमार्फत टपाली मतपत्रिका देण्यात येईल. पीबी७ मधील सूचनांनुसार मत नोंदवून, नियमाप्रमाणे बंद लिफाफ्यात संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात सदर मतपत्रिका व आवश्यक नमुने जमा करणे बंधनकारक आहे.

## 'स्वीपनगरी' म्हणजे मतदार जनजागृतीचा ऐतिहासिक वारसा– आयुक्त डांगे

### नवीन मनपा कार्यालयातील 'स्वीप कक्ष' पाहण्यासाठी नागरिकांना आवाहन

**अहमदनगर । रयत समाचार**

राज्य निवडणूक आयोगाच्या माध्यमातून मतदान व निवडणूक प्रक्रिया सातत्याने सुरू असतात. लोकशाहीचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी 'स्वीप'सारखा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा असून अहिल्यानगर महानगरपालिकेच्या स्वीप समितीचा 'स्वीपनगरी' हा कक्ष मतदार जनजागृतीच्या इतिहासात एक मैलाचा दगड ठरू शकतो, असे प्रतिपादन निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे यांनी केले. मनपाच्या नवीन प्रशासकीय इमारतीत उभारण्यात आलेल्या या कक्षाची पाहणी करताना त्यांनी मतदार जनजागृतीपर खेळांचा अनुभव घेत उपस्थितांशी संवाद साधला. अतिरिक्त आयुक्त विजयकुमार मुंढे यांच्या संकल्पनेतून मनपाच्या मुख्य प्रशासकीय



इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ स्वीप समितीच्या वतीने सुमारे ४ हजार स्केअर फूट क्षेत्रफळाचा 'स्वीप कक्ष' उभारण्यात आला आहे. या कक्षात भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग (महाराष्ट्र) यांचे जनजागृतीपर पोस्टर्स, मतदान प्रक्रिया सोप्या पद्धतीने समजावणारे मुलांसाठीचे खेळ, 'माझी सहीमाझी मनपा' हा १०० टक्के मतदानाचा उपक्रम, बाराखडीतून लोकशाही शिक्षण, 'माझी मनपा सेल्फी' पॉईंट, क्यूआर कोड वॉल, व्हीआर बॉक्स, ईव्हीएम साक्षरता, 'नोटा' पद्धतीची माहिती, भारतातील पहिला 'स्वीप केअर' व्हॉट्सॲप क्रमांक, चित्रकला स्पर्धेतील पोस्टर्स, विविध निवडणूक ॲप्स, 'एकी' मुंगी, मतदानाच्या पायऱ्या दर्शवणारा 'स्टापू' खेळ, नैतिक मतदानाचा सापशिडी खेळ, विविध अर्जांची माहिती देणारा 'भुलभुलैया', मतदान वर्णमालेचा तंबोला आदी उपक्रम मांडण्यात आले आहेत. विविध शासकीय कामानिमित्त शहर व जिल्ह्यातील नागरिक नूतन मनपा कार्यालयास भेट देत असतात. या मुख्यालयात हा कक्ष उभारण्यामागे नागरिकांमध्ये लोकशाही प्रक्रियेबाबत प्रबोधन व्हावे, हा उद्देश असल्याचे सांगण्यात आले. हा कक्ष २६ जानेवारी २०२६ पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत सर्वसामान्य नागरिकांसाठी खुला राहणार आहे. शिक्षक व पालकांनी आपल्या मुलांसह या कक्षाला भेट देऊन खेळांच्या माध्यमातून लोकशाही प्रक्रियेची माहिती घ्यावी, असे आवाहन स्वीप नोडल अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अशोक साबळे, सहाय्यक आयुक्त सपना वसावा, सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजन, मतदारदूत डॉ. अमोल बागुल, प्रसिद्धी अधिकारी नितीन ब्राह्मणे व प्रशासनाधिकारी जुबेर पठाण यांनी केले आहे.

## महाविकास आघाडीचा धार्मिक सलोख्याचा संदेश

### दमबारा हजारी व शहा शरीफ दर्ग्यावर चादर अर्पण



**अहमदनगर । रयत समाचार**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी प्रभाग क्रमांक ४ मधील मुकुंदनगर परिसरात मोटारसायकल रॅलीद्वारे भव्य रोड शो करण्यात आला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व खासदार निलेश लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या प्रचार रॅलीत युवकांचा मोठा सहभाग दिसून आला. मोटारसायकल रॅलीची सुरुवात मुकुंदनगर येथील दमबारा हजारी व शहा शरीफ दर्ग्यावर चादर अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर दुचाकी वाहनांवरून प्रचार रॅली काढण्यात आली. कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी प्रदेशाध्यक्ष सपकाळ व खासदार लंके यांनी रॅलीत सहभागी होत मतदारांशी संवाद साधत मतदानाचे आवाहन केले. महाविकास आघाडीचे नेतृत्व हे जनतेच्या प्रश्नांना न्याय देणारे असून संविधानातील समता, न्याय व बंधुता ही मूल्ये जोपासणारे आहे. सर्वसामान्यांच्या हिताचे व विकासाभिमुख धोरण राबविण्याची भूमिका असल्याचे यावेळी नेत्यांनी स्पष्ट केले. तसेच महाविकास आघाडीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले. प्रभाग क्रमांक ४ मधील काँग्रेस पक्षाचे उमेदवार शेख नसीम खान (अ), शेख फैयाज अजिजोद्दीन (ब), खान मिनाज जाफर (क) व शम्स समीर खान (ड) यांच्या प्रचारासाठी या मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. उमेदवारांनी नागरिकांशी संवाद साधत प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी संधी देण्याचे आवाहन केले. या रॅलीत राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष व माजी महापौर अभिषेक कळमकर, काँग्रेसचे शहराध्यक्ष दीप चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष निलेश मालपाणी, माजी नगरसेवक संजय झिंजे, युवक काँग्रेसचे मोसिम शेख यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

रयत समाचार **Classified** छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

STAR HEALTH
आपण कष्टाने कमावलेला पैसा हॉस्पिटल मध्ये बील भरण्यासाठी आहे का ?
CASH COUNTER
अधिक माहितीसाठी संपर्क
9049860184, 8208235485

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com** , **उपसंपादक : दिपक शिरसाठ**, 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा**, 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक**, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# अशोक पॉलिटेक्निकची इकरा काझी जिल्ह्यात प्रथम

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखालील अशोकनगर येथील अशोक इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) येथे शिक्षण घेत असलेल्या द्वितीय वर्ष सिव्हिल इंजिनिअरिंग शाखेच्या विद्यार्थिनी काझी इकरा शकील हिने तंत्रशिक्षण मंडळाच्या हिवाळी सत्रातील परीक्षेत ९६.२४ टक्के गुण मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

तिच्या या घवघवीत यशामुळे महाविद्यालयासह तालुका व जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ग्रामीण भागातून येऊन कठोर परिश्रमाच्या जोरावर जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान मिळवणाऱ्या इकरा हिने सातत्य, शिस्त व आत्मविश्वासाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. नियमित अभ्यास, विषयांचे सखोल आकलन आणि प्राध्यापकांचे योग्य मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाल्याचे तिने सांगितले. महाविद्यालयातील इतर शाखांतील विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मेकॅनिकल इंजिनिअरिंग शाखेत प्रथम वर्षातील

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अशोक पॉलिटेक्निकने उपलब्ध करून दिलेल्या शैक्षणिक सुविधा, अनुभवी प्राध्यापकवर्ग व योग्य मार्गदर्शनामुळेच माझ्या मुलीला हे यश मिळाले आहे. प्रशासन व महाविद्यालयाचे मनःपूर्वक आभार. ग्रामीण विद्यार्थ्यांना अशाच प्रकारे प्रोत्साहन मिळावे, ही अपेक्षा आहे.**

**-शकील काझी**, पालक



अमोल भाकरे (७६.२२), द्वितीय वर्षातील प्रतीक गाडेकर (७९.२२) व तृतीय वर्षातील ओमकार देसाई (८३.०६) टक्के गुण मिळवले. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगमध्ये प्रथम वर्षातील काजल मुखिया (८६.२०), द्वितीय वर्षातील मंजिरी औताडे (८६.५६) व तृतीय वर्षातील वैष्णवी खरात (८७.६५) यांनी यश संपादन केले. केमिकल इंजिनिअरिंगमध्ये प्रथम वर्षातील जयेश काळे (८२), द्वितीय वर्षातील कार्तिक ढवळे (९०) व तृतीय वर्षातील प्रज्वल भवार (८५.७५) टक्के गुण मिळवले. सिव्हिल इंजिनिअरिंगमध्ये प्रथम वर्षातील गौरव पटारे (७५), द्वितीय वर्षातील इकरा काझी (९६.२४) व तृतीय वर्षातील अंजली तोरणे (८६.८९) तर कॉम्प्युटर इंजिनिअरिंगमध्ये प्रथम वर्षातील स्नेहल कोकाटे व ओम काळे (८४.५९), द्वितीय वर्षातील धनश्री वाघ (८९.२९) व तृतीय वर्षातील अथर्व चव्हाण (९१.१८) यांनी विभागात प्रथम क्रमांक मिळवला. या यशाबद्दल संस्थेच्या कार्यकारी अधिकारी मंजुश्री मुरकुटे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व सर्वांगीण शिक्षण देणे हे संस्थेचे प्रमुख ध्येय आहे. ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांना समान संधी, आधुनिक सुविधा, सुसज्ज प्रयोगशाळा व अनुभवी प्राध्यापकवर्ग उपलब्ध करून देण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक माजी आमदार भानुदास मुरकुटे, बाबासाहेब आदिक, कोंडीराम उंडे, उपाध्यक्ष योगेश विटनोर, सोपानराव राऊत, विरेश गलांडे, सिद्धार्थ मुरकुटे तसेच संचालक मंडळाने काझी इकरा व सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

इकरा काझी यांच्या या उल्लेखनीय यशामुळे ग्रामीण व सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थिनींसाठी त्या प्रेरणास्थान ठरत असून, सिव्हिल इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थ्यांमध्ये नवी उमेद व उत्साह निर्माण झाला आहे.उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्राचार्य अंजाबापू शिंदे, उपप्राचार्य अरुण कडू, विभागप्रमुख मयूर पांडागळे, विशाल घोगरे, महेश नवपुते, रामेश्वर पवार, प्रशांत कोतकर आदी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले.



# सोमैया, रोहमारे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची सैन्य व पोलिस दलात निवड

**कोपरगाव । किसन पवार**

के. जे. सोमैया (वरिष्ठ) व के. बी. रोहमारे (कनिष्ठ) महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) विभागातील तीन विद्यार्थ्यांची भारतीय सैन्य दलात अग्निवीर म्हणून, तर एका विद्यार्थ्याची कारागृह पोलिस म्हणून निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय ठाणगे यांनी दिली.

एन.सी.सी. विभागाचे छात्रसैनिक कुणाल लांडगे, ऋषिकेश सोनवणे व उमेश सरडे यांची भारतीय सैन्य दलात अग्निवीर म्हणून निवड झाली आहे. हे तिघेही लवकरच प्रशिक्षणासाठी अनुक्रमे बॉम्बे सॅपर्स पुणे, मराठा लाईट इन्फंट्री बेळगाव आणि महार रेजिमेंट सागर येथे रवाना होणार आहेत. तसेच महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाचा राष्ट्रीय स्तरावरील बेसबॉल खेळाडू मुस्तकीम पीरजादे याची मुंबई येथे कारागृह पोलिस या पदावर निवड झाली आहे.

गेल्या अनेक महिन्यांच्या कठोर परिश्रमांचे हे फलित असल्याचे प्राचार्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोक रोहमारे, सचिव ॲड. संजीव कुलकर्णी, विश्वस्त संदीप रोहमारे, प्राचार्य डॉ. विजय ठाणगे तसेच प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारीवृंद यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

अग्निवीर म्हणून निवड झालेल्या छात्रसैनिकांना एन.सी.सी. प्रमुख कॅप्टन डॉ. नितीन शिंदे व लेफ्टनंट प्राध्यापिका वर्षा आहेर यांचे मार्गदर्शन लाभले, तर मुस्तकीम पीरजादे याला शारीरिक शिक्षण संचालक डॉ. सुनील कुटे यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले. या यशामुळे महाविद्यालयाचा नावलौकिक वाढला असून परिसरातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# प्रज्ञा बागुल 'ऑल इंडिया बार एक्झाम'मध्ये उत्तीर्ण

**श्रीरामपूर । संदीप पाळंदे**



येथील ॲड. प्रज्ञा सुधाकर बागुल हिने नुकत्याच झालेल्या 'ऑल इंडिया बार एक्झामिनेशन' परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. या यशामुळे तिने वकिली व्यवसायासाठी आवश्यक असलेली महत्त्वाची पायरी पार केली असून, आता तिला देशभरात कोठेही वकिली करण्याची अधिकृत सनद प्राप्त झाली आहे. एलएलबी पदवी पूर्ण केल्यानंतर दोन वर्षांच्या आत ही परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असते. या परीक्षेत घटनात्मक कायदा, पर्यावरण, कंपनी कायदा, कामगार व औद्योगिक कायदा, मोटार वाहन अधिनियम, ग्राहक संरक्षण, भू-संपादन, बौद्धिक संपदा व प्रशासकीय व्यवस्था अशा विविध विषयांवर आधारित लेखी परीक्षा घेतली जाते. या सर्व विषयांत प्रज्ञाने सखोल तयारी करून हे यश मिळवले आहे. प्रज्ञा ही शं. स. डावखर कन्या शाळेचे सेवानिवृत्त कर्मचारी सुधाकर बागुल व प्रमिला बागुल यांची कन्या आहे. तिला खा. गोविंदराव आदिक विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या ॲड. संघमित्रा विजय खाजेकर-राजभोज यांचे मार्गदर्शन लाभले. मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलीने जिद्दीच्या जोरावर मिळवलेल्या या यशाबद्दल बागुल कुटुंबावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# प्राईड अकॅडमीत सर्वोत्तम विद्यार्थी घडतील-गिरी

**टाकळीभान । शफिक बागवान**

प्राईड अकॅडमीमध्ये अध्यात्मिक, संस्कारक्षम व दर्जेदार आधुनिक शिक्षण दिले जात असल्याने येथे भविष्यात जगातील सर्वोत्तम विद्यार्थी घडतील, असे प्रतिपादन देवगडचे स्वामी प्रकाशनंद गिरी यांनी केले. माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे व माजी सभापती डॉ. वंदना मुरकुटे यांच्या टाकळीभान येथील प्री-स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून टाकळीभान सोसायटीचे चेअरमन मंजाबापू थोरात, अशोकचे माजी व्हा. चेअरमन पुंजाहरी शिंदे, सरपंच अर्चनाताई रणनवरे, दिलावर पठाण, कारभारी तागड, भारत भवार, शांताराम तुवर, विराज भोसले, राजेंद्र कोकणे, अर्जुन राऊत, प्रकाश जाधव, रामकृष्ण गायकवाड आदी उपस्थित होते. प्रकाशनंद गिरी पुढे म्हणाले की, शिक्षणाच्या माध्यमातून देशाची संस्कृती व राष्ट्रसेवेची भावना जोपासली जात असून विद्यार्थ्यांना इंग्रजी, मराठी, संस्कृतसह विविध भाषांचे ज्ञान दिले जात आहे. अध्यात्माची जोड दिलेल्या शिक्षणामुळे येथे सर्वगुणसंपन्न व परिपूर्ण विद्यार्थी घडतील आणि ते जगाच्या पाठीवर चमकतील.

प्रस्ताविक करताना प्राईड अकॅडमीच्या संचालिका डॉ. वंदना मुरकुटे म्हणाल्या की, समाज बांधणीसाठी सुसंस्कृत पिढी घडविण्याच्या उद्देशाने अध्यात्मिकतेची जोड देऊन शिक्षण दिले जात आहे. विद्यार्थ्यांना क्रीडा व सांस्कृतिक गुणांसह आधुनिक शिक्षण देण्यात येत असून गेल्या १३ वर्षांपासून प्राईड अकॅडमीमध्ये फिनिक्स विषय शिकवला जात आहे. कोडिंग व प्रोग्रामिंगसह लवकरच ए.आय. लॅब सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास एकनाथ पटारे, विलास दाभाडे, प्रताप पटारे, केरूबापू मगर, सुदामराव पटारे, योगेश उंडे, राहुल बनकर, आबासाहेब ढूस, मोहन रणनवरे, बाळासाहेब कोकणे, बाबुराव तागड, राहुल अभंग, अशोक गायकवाड, भैय्या पठाण यांच्यासह टाकळीभान परिसरातील पदाधिकारी, ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. प्रदीप गोराणे, जयश्री वाडेकर, सुप्रिया कोकणे, अदिती जंगम व मिरीकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत शेतकरी प्रशिक्षण संपन्न



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

मौजे चिंभळे येथे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला. कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी क्रांती चौधरी-मोरे यांच्या विद्यमाने व मंडळ कृषी अधिकारी बेलवंडी बु. शीतल आरु यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अन्नधान्य पिके सन २०२५२६ अंतर्गत ज्वारी, मका व हरभरा पिकांवर हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमात कृषी विज्ञान केंद्र, दहिगावने (ता. शेवगाव) येथील विषय विशेषज्ञ नंदकुमार दहातोंडे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी रब्बी हंगामातील प्रमुख पिकांबाबत सखोल व तांत्रिक माहिती देत कांदा, डाळिंब आदी पिकांवरील आधुनिक शेती तंत्रज्ञान, कीड-रोग व खत व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात क्षेत्रभेटी, शेतकऱ्यांशी सविस्तर चर्चा तसेच प्रश्नोत्तरांचा समावेश करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रगतशील शेतकरी राजेंद्र गायकवाड यांनी भूषविले.

यावेळी सरपंच संजय सावंत, उपसरपंच वैभव गायकवाड, चेअरमन रावसाहेब पाटील, अजित गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, राजापूर येथील प्रगतशील शेतकरी शांताराम वाबळे, देवदैठणचे उपसरपंच तुषार वाघमारे, शिवाजी (बापू) वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन सहाय्यक कृषी अधिकारी अशोक नेर्लेकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. यावेळी दळवी, मेहेत्रे गोरख, केशव अनारसे, विशाल सूर्यवंशी व घोडके यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक कृषी अधिकारी प्रतिक कांबळे (पिंप्री कोलंदर) यांनी केले, तर आभार सहाय्यक कृषी अधिकारी बाळकृष्ण बनकर (बेलवंडी बु.) यांनी मानले. या प्रशिक्षण कार्यक्रमास परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घेतला.



# ठाकुरदास परदेशी यांना 'बाबुराव पेंटर पुरस्कार'

**अहमदनगर । आबीद खान**

श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला यांच्या संयुक्त विद्यमाने दादर येथील धुरू हॉल येथे आयोजित शिवोत्सव२०२६ कार्यक्रमात अहिल्यानगर येथील दुर्गप्रेमी व दुर्ग छायाचित्रकार ठाकुरदास परदेशी यांना बाबुराव पेंटर प्रोत्साहनपर पुरस्काराने गौरविण्यात आले.

या कार्यक्रमात युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेल्या १२ किल्ल्यांच्या छायाचित्रांची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत परदेशी यांच्या 'सुवर्णदुर्ग' या जलदुर्गाच्या छायाचित्राची निवड करण्यात आली. महाराष्ट्राचा समृद्ध वारसा जतन व प्रसारासाठी दिलेल्या योगदानाबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या प्रसंगी ज्येष्ठ इतिहास संकलक दुर्गमहर्षी आप्पा परब, सेवानिवृत्त नायब सुभेदार सोपान जाधव, शंभू व्याख्याते अक्षय चांदेल, रविंद्र मालुसरे, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय (महाराष्ट्र राज्य) चे संचालक डॉ. तेजस गर्गे तसेच श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनलचे प्रमुख डॉ. हेमंतराजे गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

## नगरपरिषदेचा विजय म्हणजे जनतेचा विश्वास

# शहरानंतर आता गाव जिंकण्याची तयारी करा-कोल्हे

**कोपरगाव । किसन पवार**




कोपरगाव नगरपालिकेचा विजय हा केवळ राजकीय विजय नसून जनतेचा विश्वास संपादन करण्याचा विजय आहे. अनेक विरोधी शक्ती असतानाही थेट जनतेसमोर जाऊन विकासाचे व्हिजन मांडले आणि त्यामुळेच हा विजय मिळाला. आज लोक विकासावर बोलणाऱ्यालाच साथ देतात, असे प्रतिपादन युवानेते विवेक कोल्हे यांनी केले.

कोपरगाव तालुक्यातील शिंगणापूर येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यादवराव संवत्सरकर होते. यावेळी नगराध्यक्ष पराग संधान, गटनतेपदी निवड झालेले प्रसाद आढाव यांच्यासह विवेक कोल्हे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. ते पुढे म्हणाले की, दिवंगत शंकरराव कोल्हे यांची जन्मभूमी असलेल्या या परिसरात जाणीवपूर्वक राजकीय षडयंत्र रचले जात आहे. हे डावपेच उधळून लावण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. नागरिकांनी केवळ आदेशांची वाट न पाहता सार्वजनिक प्रश्नांसाठी संघर्ष करायला हवा. आम्ही सत्तेत नसून सत्ताधारी पक्षात आहोत, त्यामुळे गरज भासल्यास भांडूनही प्रश्न सोडवले पाहिजेत, असे ते म्हणाले. जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना व जुन्या तळ्याच्या कामात अडथळे आणले जात असल्याचा आरोप करत विवेक कोल्हे यांनी संबंधित कंत्राटदाराला राजकीय वरदहस्त मिळत असल्याचे सांगितले.

ग्रामपंचायत प्रशासनाला वॉटर एटीएमची संख्या वाढवण्याच्या सूचना देत, कायमस्वरूपी पाणीपुरवठा होईपर्यंत पाण्यासाठी आकारले जाणारे पाच रुपये घेऊ नयेत व महिलांना मोफत पाणी उपलब्ध करून देण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला. गरज भासल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी नगराध्यक्ष पराग संधान म्हणाले की, कोपरगाव नगरपालिकेच्या विजयात ग्रामीण भागाचा मोठा वाटा आहे. कार्यकर्त्यांच्या एकीमुळेच हा विजय शक्य झाला असून हीच एकी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्येही दाखवावी लागेल. विरोधकांच्या तथाकथित विकासाच्या दाव्यांवर टीका करत त्यांनी सांगितले की, विकास फक्त फ्लेक्सवर दिसत होता, प्रत्यक्षात मात्र काहीच नव्हते. कोल्हे कुटुंब आधी काम करते आणि नंतर सांगते, याचीच प्रचिती जनतेला आली आहे. कार्यक्रमास नगरसेवक जितेंद्र रणशूर, संतोष शिंदे, केशव भवर, मच्छिंद्र लोणारी, गणेश वाणी, सरपंच डॉ. विजय काळे, उपसरपंच रत्नाताई संवत्सरकर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, विविध संस्थांचे पदाधिकारी व शिंगणापूर गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विवेक कोल्हे म्हणाले की, कोपरगाव शहरात जे घडले तेच आता प्रत्येक गावात घडवायचे आहे. येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी सज्ज राहून लढावे लागेल. शहर जिंकले असून आता गावही जिंकायचे आहे. त्याची मुहूर्तमेढ शिंगणापूरपासून रोवली गेली आहे.**

# गोड गळ्याचे गायक : येसुदास



आज १० जानेवारी हिंदी चित्रपट सृष्टीतील ख्यातनाम गायक आणि संगीतकार येसुदास यांची ८६ वाढदिवस. हिंदी चित्रपट सृष्टीत ज्या गायकांनी आपल्या मधुर आवाजाने ठसा उमटवला त्यात येसुदास हे एक महत्वाचे नाव. १० जानेवारी १९४० रोजी एका मल्याळम ख्रिश्चन कुटुंबात जन्मलेल्या येसुदास यांचे वडील मल्याळम भाषेतील शास्त्रीय संगीतकार होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी संगीतकलेचे प्राथमिक धडे गिरवले. वयाच्या सातव्या वर्षी कोची येथील स्थानिक स्पर्धेत भाग घेऊन त्यांनी सुवर्णपदक जिंकले. कन्नड, मल्याळम, तेलगू आणि तामिळ या दक्षिण भारतातील सर्व भाषेत त्यांनी गाणी गायली तिथे त्यांनी गायलेली सर्वच गाणी हिट झाली. त्यांच्या आवाजाची परदेशातील रसिकांना देखील भुरळ पडली. १९६५ साली रशियन सरकारने त्यांना गाण्यासाठी खास आमंत्रण दिले होते. गोड, मखमली आवाज ही येसुदास यांची ओळख बनली. त्यांच्या गोड आणि मखमली आवाजाची कीर्ती हिंदी चित्रपट सृष्टी पर्यंत पोहचली नसती तरच नवल. संगीतकार सलील चौधरी यांनी त्यांना दिग्दर्शक बासू चॅटर्जी यांच्या छोटीशी बात या चित्रपटात साठी एक गाणे गायला लावले. त्यांच्या आवाजाने बासू चॅटर्जी हे ही प्रभावित झाले त्यांनी त्यांना त्यांच्यव चित्रपटात गाण्याची ऑफर दिली. १९७० सालापासून त्यांनी हिंदी गाणी गायला सुरवात केली. जानेमन जानेमन तेरे दो नयन.... या गाण्यानंतर शांत सज्जन दिसणारा अमोल पालेकर यांच्यासाठी येसुदास यांचाच आवाज सूट होतो असा असे गणित बॉलिवूडने बांधले. येसुदास यांच्या मधुर आवाजामुळे अनेक संगीतकार त्यांना त्यांच्यासाठी गाण्याची गळ घालू लागले मात्र येसुदास हे गाण्याची निवड मात्र विचारपूर्वक करत. येसुदास यांनी फक्त अमोल पालेकर यांच्यासाठीच नाही तर अमिताभ बच्चन आणि जितेंद्र यांच्यासाठीही गाणी गायली. त्यांनी रवींद्र जैन, बप्पी लाहिरी, खय्याम, राजकमल, सलील चौधरी या संगीतकारांसमवेत अनेक सदाबहार हिंदी चित्रपटातील गाणी गायली. त्यांनी जवळपास ४५००० गाणी गायली आहेत. सध्याच्या पद्धतीची गाणी त्यांना आवडत नाहीत म्हणून त्यांनी बऱ्याच वर्षांपासून गाणे गायचे थांबवले आहे. येसुदास यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. भारत सरकारने त्यांना २००२ सालीं पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार दिला आहे तर केरळ सरकारने त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील सर्वोत्तम स्वाती पुरस्कारम या पुरस्काराने गौरविले आहे. त्यांना राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाले आहेत. येसुदास यांनी काही दाक्षिणात्य भाषेतील चित्रपटांची निर्मितीही केली आहे. येसुदास यांनी गायलेली गोरी तेरा गाव बडा प्यारा, सुरमई अखियों मे, दिल के तुकडे तुकडे करके, जानेमन जानेमन तेरे दो नयन, चांद जैसे मुखडे पे ही गाणी आजही लोकप्रिय आहेत. येसुदास यांचे चाहते केवळ भारतातच आहेत असे नव्हे जगभर त्यांचे चाहते आहेत. गोड आणि मखमली आवाजाचे गायक येसुदास यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# सतीश लहाने यांचा 'शिक्षक भारती'कडून गौरव



**अहमदनगर । रयत समाचार**

प्रशासकीय सेवेत आपल्या कामाचा ठसा उमटवणारे व नुकतेच जलसंधारण विभागातून पदोन्नती होऊन जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाच्या लेखा पडताळणी कार्यालयात लेखाधिकारी म्हणून रुजू झालेले सतिष लहाने यांचा 'शिक्षक भारती' संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यांच्या कार्यालयात जाऊन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी पुणे शिक्षण उपसंचालक कार्यालयातील कैलास शिंदे यांचीही पदोन्नती झाल्याबद्दल संघटनेच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. या दुहेरी सत्कार सोहळ्यामुळे शिक्षण विभागात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. जलसंधारण विभागात उत्कृष्ट कामगिरी केल्यानंतर शिक्षण विभागात पदोन्नती मिळाल्याने सतिष लहाने यांच्या प्रशासकीय अनुभवाचा जिल्ह्यातील शिक्षकांना मोठा लाभ होईल. शिक्षक व प्रशासन यांच्यातील दुवा म्हणून ते सकारात्मक भूमिका बजावतील, असा विश्वास शिक्षक भारतीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या सत्कारप्रसंगी शिक्षक भारतीचे पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर, विनाअनुदान विरोधी संघर्ष समितीच्या राज्याध्यक्षा रूपाली कुरूमकर, जिल्हा संघटक चंद्रशेखर हासे, श्रीगोंदा महिला तालुकाध्यक्षा रूपाली बोरुडे, बळिराम फरगडे, दुधाडे, विक्रम आंबरे यांच्यासह शिक्षक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना सतिष लहाने यांनी शिक्षक भारती संघटनेचे आभार मानले. शिक्षकांची प्रलंबित देयके, भविष्य निर्वाह निधी तसेच लेखा पडताळणीशी संबंधित कामांना प्राधान्य देऊन ती वेळेत पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. या कार्यक्रमातून नवनियुक्त अधिकाऱ्यांचे स्वागत तर झालेच, शिवाय शिक्षक भारती संघटनेने प्रशासनाशी सुसंवाद साधत शिक्षकांच्या हिताचा दृष्टीकोन मांडला. या उपक्रमाचे शिक्षण क्षेत्रात सर्वत्र कौतुक होत आहे. संघटनेच्या वतीने उच्च माध्यमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष रामराव काळे, जिल्हा उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद, दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, सहसचिव राहुल कानवडे, तालुका अध्यक्ष सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, साई थोरात, संपत वाळके, नानासाहेब खराडे, कल्पना चौधरी, मफीज इनामदार, दीपक फापाळे, गणपत धुमाळ, विजय पांडे, अमोल तळेकर, संतोष नवले, बाबासाहेब तांबे, अकील फकीर, बाबाजी लाळगे, वैभव चोथे, प्रवीण मालुंजकर, श्याम जगताप आदी उपस्थित होते.

# केंद्रीय लोककला महोत्सवासाठी भगवान राऊत यांची निवड

**अहमदनगर । रयत समाचार**



येथील लोककला अभ्यासक व मुक्त पत्रकार भगवान भागिनाथ राऊत यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने ता. ११ व १२ जानेवारी २०२६ रोजी विद्यापीठ परिसरात होणाऱ्या केंद्रीय लोककला महोत्सवासाठी परीक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे पत्र विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभुरे यांच्या स्वाक्षरीसह त्यांना प्राप्त झाले आहे. या महोत्सवात मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड व धाराशिव या चार जिल्ह्यांतील ६५ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला आहे. केंद्रीय लोककला महोत्सवात महाराष्ट्राच्या पारंपरिक ११ लोककला प्रकारांमध्ये स्पर्धा आयोजित करण्यात आल्या असून त्यात गोंधळ, पोवाडा, भजन, भारुड, लावणी, लोकगीत, लोकनाट्य, वासुदेव, कव्वाली, जलसा व कविता या सांघिक व वैयक्तिक स्पर्धांचा समावेश आहे. यामध्ये भारुड (सांघिक) व वासुदेव (वैयक्तिक) या दोन लोककला प्रकारांसाठी भगवान राऊत यांची परीक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल आ. संग्राम जगताप, माजी आ. लहू कानडे, माजी आ. भीमराव धोंडे, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे तसेच कार्यक्रम अधिकारी निलेश धुमाळ यांनी अभिनंदन केले आहे.



# नरेश चव्हाण यांची भाजप शहर उपाध्यक्षपदी नियुक्ती

**अहमदनगर । समीर मन्यार**

भारतीय जनता पार्टी अहिल्यानगर शहर उपाध्यक्षपदी सर्जेपुरा येथील नरेश नीलदास चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून चव्हाण हे पक्षासाठी सातत्याने संघटनात्मक काम करत असून, पक्षबांधणीसाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. समाजातील वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी विविध स्तरांवर कार्य केले आहे. चव्हाण यांच्या या कार्याची दखल घेत भाजप नेतृत्वाने त्यांची शहर उपाध्यक्षपदी निवड केली आहे. त्यांच्या नियुक्तीचे पत्र पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या नियुक्तीमुळे पक्षाच्या संघटनात्मक बळकटीस चालना मिळेल तसेच पक्षविस्ताराच्या दृष्टीने नरेश चव्हाण आपली जबाबदारी सक्षमपणे पार पाडतील, असा विश्वास पालकमंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला. दरम्यान, चव्हाण यांच्या नियुक्तीबद्दल भाजप कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



# गिरिश गायकवाड यांचा सेवापूर्ती सोहळा संपन्न

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा येथील महसूल विभागातील कर्तव्यनिष्ठ मंडळाधिकारी गिरिश गायकवाड यांनी ३४ वर्षांची प्रदीर्घ शासकीय सेवा पूर्ण करून ३१ डिसेंबर २०२५ रोजी सेवानिवृत्ती स्वीकारली. त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त प्रांताधिकारी श्रीकुमार चिंचकर तसेच तहसीलदार सचिन डोंगरे व नायब तहसीलदार मिलिंद जाधव यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

गिरिश गायकवाड यांनी ६ जून १९९१ रोजी नगर तहसील कार्यालयात नक्कलनवीस म्हणून सेवेत पदार्पण केले. सन २००२ मध्ये शासन निर्णयानुसार त्यांची वर्ग-३ लिपिक म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर लिपिक, पुरवठा निरीक्षक, गोदाम व्यवस्थापक, मंडळाधिकारी आदी विविध पदांवर कार्यरत राहून त्यांनी शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविल्या. सेवाकाळात लोकाभिमुख दृष्टिकोन ठेवून काम करत अनेक गरजू नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिला. नगर व श्रीगोंदा तालुक्यात कार्यरत असताना लोकप्रतिनिधी तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांचे त्यांना सहकार्य लाभले. तसेच कास्ट्राईब कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष व महसूल कर्मचारी संघटनेचे नाशिक विभाग सरचिटणीस म्हणून कार्यरत राहून कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. सेवानिवृत्तीनिमित्त गिरिश गायकवाड यांनी सर्व वरिष्ठ अधिकारी, सहकारी कर्मचारी, लोकप्रतिनिधी, पत्रकार बंधू व मित्रपरिवाराचे आभार मानले.

# रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त 'रस्ते वाहतूक व सुरक्षा अभियान'

**राहाता । शफिक बागवान**

विद्यार्थ्यांनी वाहन चालवताना हेल्मेटचा वापर बंधनकारकपणे करावा. घरी आपली वाट पाहणारे आई-वडील, भाऊ-बहिणी व नातेवाईक आहेत, हे लक्षात ठेवूनच सुरक्षित व जबाबदारीने वाहन चालवावे. आपणही सुरक्षित राहावे आणि इतरांनाही सुरक्षित ठेवावे, असे प्रतिपादन साई रुरल इन्स्टिट्यूटच्या संचालिका धनश्री विखे यांनी केले. राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त शिर्डी साई रुरल इन्स्टिट्यूटचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राहाता येथे ''रस्ते वाहतूक व सुरक्षा अभियान'' राबविण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी सिद्धार्थ भन्साळी, मोईन खान, किरण सदाफळ, अफताफ देशमुख, डॉ. सत्यजित पोतदार, कमलाकर कसबे, किशोर निर्मळ, प्राध्यापक, प्राध्यापकेतर सेवक, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या अभियानामुळे विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण झाली असून सुरक्षित वाहनचालनाचा सकारात्मक संदेश पोहोचला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. चंद्रकांत बनसोडे यांनी केले तर आभार उपप्राचार्य डॉ. सत्यजित पोतदार यांनी मानले.

# 'चि व चि सौ का'ची हिट जोडी पुन्हा एकत्र

## ललित प्रभाकर-मृण्मयी गोडबोले 'तो, ती आणि फुजी'मध्ये झळकणार

**मुंबई । राम कोंडीलकर**

अत्यंत महत्त्वाच्या आणि मानाच्या २४व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (PIFF), ''तो, ती आणि फुजी''ची अधिकृत निवड झाली असून, या महोत्सवातील प्रतिष्ठित मराठी फीचर फिल्म स्पर्धा विभागात या चित्रपटाचा जागतिक प्रीमियर होणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या ''संत तुकाराम'' सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट पुरस्कारासाठी हा चित्रपट स्पर्धेत असून, हा त्याच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरतो. ह्या चित्रपटाचे चित्रीकरण जपान आणि भारतात झाले असून हा एक अभूतपूर्व मराठी रोमँटिक चित्रपट आहे. जपान केवळ पार्श्वभूमी किंवा वेगळे स्थळ म्हणून नाही, तर पात्रांच्या आतल्या भावनिक अंतराचे प्रतिबिंब असलेल्या भावनिक अवकाशासारखा उलगडतो. हा चित्रपट अंतर, काळ आणि बदलत्या भावनिक वास्तवामुळे नातेसंबंध कसे बदलतात याचा शोध घेतो. सुरुवातीला अतिशय उत्कट असलेले एक नाते काळानुसार, प्राधान्यक्रमांमुळे, परस्परविरोधी स्वभावांमुळे व अनाठायी अपेक्षांमुळे कसे विषारी बनते हे या कथानकातून उलगडते. विभक्त झाल्यानंतर सात वर्षांनी ते पुन्हा एकदा जपानमध्ये भेटतात तेव्हा जुन्या जखमा, अर्धवट राहिलेल्या गोष्टी, भावना, इच्छा पुन्हा एकदा डोकं वर काढतात आणि काळाने बदललेली माणसं त्यांच्यातील विरलेले प्रेम पुन्हा शोधू शकतात का? इरावती कर्णिक यांनी ह्याच्या आधी ''झिम्मा'', ''आनंदी गोपाळ'' यांसारखे महत्त्वाचे चित्रपट लिहिलेले आहेत व मोहित टाकळकर यांनी ''मीडियम स्पायसी'', ''द ब्राईट डे'',''चिरेबंदी'', ''ऑकेजनल रिफ्लेक्शन ऑन द कॉन्टिन्जेन्सीज ऑफ लाईफ'' असे चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. या चित्रपटातून ललित प्रभाकर आणि मृण्मयी गोडबोले पुन्हा एकदा एकत्र पडद्यावर येत आहेत. २०१७ मधील बहुचर्चित ''चि व चि सौ का'' नंतर ही जोडी पुन्हा दिसणार असून, त्यांच्या सादरीकरणात सहजता आणि भावनिक खोली जाणवते. टोरंटो इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल २०२५ मधील ''बयान'', बर्लिनाले २०२३ मधील ''घात'' आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेता ''पिकासो'' यांसारख्या चित्रपटांसाठी ओळखले जाणारे शिलादित्य बोरा यांनी प्लटून वन फिल्म्स या बॅनरखाली या चित्रपटाची निर्मिती केली आहे. हा चित्रपट निराळ्या, दिग्दर्शक-केंद्रित सिनेमाला प्रोत्साहन देण्याच्या बांधिलकीला पुढे नेतो. ''आपल्या दोघांच्या आठवणी वेगवेगळ्या असतील तर?'' ह्या एका वाक्याने मी फार प्रभावित झालो असं चित्रपटाच्या निवडीबद्दल बोलताना निर्माते शिलादित्य बोरा म्हणाले. हाच प्रश्न या कथानकाच्या केंद्रस्थानी आहे. दोन व्यक्ती एकाच नात्यात, एकाच क्षणात असतात, पण त्या अनुभवांना वेगवेगळ्या पद्धतीने जतन करतात. काळ जसा पुढे सरकतो, तसं प्रेम बदलतं, कधी कधी तुटतंही. ते खोटं होतं म्हणून नाही, तर आठवणी, प्राधान्यक्रम आणि आपापली विश्व वेगळी होऊ लागतात. मराठी सिनेमाच्या कक्षा कशा रुंदावतील, त्याच्या सीमा आपल्याला कशा ओलांडता येतील ह्याचा विचार या चित्रपटामध्ये नक्की आहे. ''घात'' च्या तीव्र वास्तववादापासून ते ''पिकासो'' च्या शांत, अंतर्मुख करणाऱ्या जगापर्यंत अशा निराळ्या धाटणीच्या चित्रपटांची निर्मिती करण्याचा प्रयत्न प्लटून वन फिल्म्स ने नेहमीच केला आहे. ''तो, ती आणि फुजी'' ही त्याच मालिकेतील नवी कथा, नव्या पद्धतीने सांगायचा प्रयत्न आहे. सारख्या महत्त्वाच्या महोत्सवात हा चित्रपट सादर करताना आम्हाला खूप आनंद होत आहे.'' दिग्दर्शक मोहित टाकळकर म्हणाले, ''पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील मराठी स्पर्धा विभागात ''तो, ती आणि फुजी'' ची निवड होणं अत्यंत समाधानकारक आहे. दरवर्षी पुणे शहर अत्यंत गंभीरपणे आणि कुतूहलाने ह्या महोत्सवाची वाट पाहातं. हा एक प्रकारे सांस्कृतिक क्षण आहे. PIFF मधे भाषेच्या सीमांना ओलांडून वेगवेगळ्या देशांचे चित्रपट प्रदर्शित तर होतातच परंतु ह्या कामांचा एकमेकांमध्ये संवाद घडतो, याचा मला विशेष आनंद आहे. हा चित्रपट ठामपणे शहरी आहे, समकालीन पुण्यात रुजलेला आहे. यातील पात्रं सोप्या उत्तरांनी प्रश्न सोडवताना दिसत नाहीत. आपापली भावनिक अस्वस्थता ठामपणे मांडतात आणि त्यावर अडूनही राहतात. चित्रपटाची कथा सरळसोट नाही. पात्रांच्या फाटलेल्या मनाची गुंतागुंत दाखवणारी आहे. गोष्टी सोप्या उत्तरांनी मिटवण्याऐवजी भावनिक अस्वस्थतेत असण्याची हिंमत ठेवतो. चित्रपटाच्या पहिल्या सार्वजनिक प्रदर्शनासाठी PIFF पेक्षा योग्य व्यासपीठ दुसरं असूच शकत नाही. विचारवंत, प्रश्न विचारणाऱ्या आणि अस्वस्थ होण्याची तयारी असलेल्या प्रेक्षकांसमोर हा चित्रपट प्रथमच सादर होतो आहे, याबद्दल मी कृतज्ञ आहे.'' अनुभवी आणि संवेदनशील, सर्जनशील टीममुळे हा चित्रपट शक्य झाला आहे. अभिनयापासून दृश्यरचनेपर्यंत प्रत्येक घटक पात्रांचा आतला प्रवास उलगडायला मदत करतात. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना मृण्मयी गोडबोले (''झिम्मा'', CRD", "High) म्हणाली, ''माझ्यासाठी ही व्यक्तिरेखा आजच्या काळातील स्त्रीचं अचूक चित्रण आहे. ती प्रेम, स्वायत्तता, जबाबदारी यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न करते. मध्ये हा चित्रपट दाखवला जाणार याचा मला आनंद आहे, आणि प्रेक्षकांचा प्रतिसाद पाहण्याची उत्सुकता आहे.'' ललित प्रभाकर (''आनंदी गोपाळ'', ''झोंबिवली''Smile Please) म्हणाला, ''या चित्रपटामागचा प्रवास माझ्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. अनेक टप्प्यांवर तो आव्हानात्मक होता, पण तितकाच समाधानकारकही. शेवटपर्यंत या चित्रपटावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा मी ऋणी आहे. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातजिथे प्रेक्षक हा चित्रपट पहिल्यांदाच अनुभवतीलतो प्रदर्शित होतो आहे, ही गोष्ट अत्यंत खास आणि समाधान देणारी आहे.'' ''तो, ती आणि फुजी'' हा चित्रपट प्रेम, विभक्त होणं आणि काळ बदलल्यानंतर पुन्हा भेटणं याकडे अत्यंत वैयक्तिक नजरेने पाहतो, आणि प्रेक्षकांना त्यांच्या स्वतःच्या अनुभवलेल्या किंवा विसर पडलेल्या नात्यांवर विचार करायला भाग पाडतो. प्लटून वन फिल्म्स ही भारतातील आघाडीची स्वतंत्र चित्रपट निर्मिती संस्था असून, बर्लिनाले टॅलेंट्सचे माजी विद्यार्थी शिलादित्य बोरा यांनी तिची स्थापना केली आहे. वेगळ्या पद्धतीच्या चित्रपटांना प्रोत्साहन देण्यासाठी ही संस्था ओळखली जाते. संस्थेच्या गाजलेल्या चित्रपटांमध्ये ''युअर्स ट्रुली'' (Zee ५), राष्ट्रीय पुरस्कार विजेता ''पिकासो'' (Amazon Prime Video) आणि ''भगवान भरोसे'' (Amazon Prime Video, Channel ४) यांचा समावेश आहे. अलीकडेच हुमा कुरेशी अभिनीत ''बयान'' चा टोरांटो इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल २०२५ मधील Discovery विभागात जागतिक प्रीमियर झाला. सर्जनशील वाटचाल पुढे नेत, प्लटून वन फिल्म्स ने ओडिशा चित्रपटसृष्टीतही पदार्पण केले असून, ''बिंदूसागर'' हा चित्रपट ५६व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (IFFI), गोवा येथे प्रदर्शित झाला. या वर्षी ''बयान'', ''बिंदूसागर'', ''मिनिमम'' आणि ''तो, ती आणि फुजी'' असे चार चित्रपट प्रदर्शित होणार असून, प्लटून वन फिल्म्स साठी हे वर्ष अत्यंत महत्त्वाचं ठरणार आहे.

